# मराठी विश्वकोशाचे अभिजात भाषा आणि साहित्य ज्ञानमंडळ

मराठी विश्वकोशाच्या संकेतस्थळाचे उद्घाटन आणि नवीन अद्ययावत विश्वकोश मोबाईल ॲपचे लोकार्पण मा. मंत्री विनोद तावडे, मराठी भाषा विभाग यांच्या हस्ते दि. २९ ऑगस्ट २०१९ रोजी अटल स्मृती उद्यान, बोरीवली येथे झाले. त्यावेळी समन्वयक म्हणून केलेल्या उत्तम कामाबद्दल सौ. सुनीला गोंधळेकर यांचा सत्कार मंत्री महोदयांच्या हस्ते करण्यात आला.

मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण करण्याच्या दृष्टीने २०१५ साली ज्ञानमंडळ ही संकल्पना पुढे आली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी १९६० च्या दशकात हा प्रकल्प उभा करताना अनेक लेखक, तज्ज्ञ, शास्त्रज्ञ आणि देशविदेशातील मार्गदर्शक यांचा पाठिंबा मिळविला होता. हे कार्य व्यापक स्वरूपाचे असल्याने तिला राज्यातील सर्वच तज्ज्ञ, शास्त्रज्ञ, लेखक, संशोधक आणि विविध विद्याशाखीय संस्था यांचा पाठिंबा आणि सक्रिय सहभाग मिळणे गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन अध्यक्ष मा. दिलीप करंबेळकर यांनी महाराष्ट्रातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था यांनी मराठी विश्वकोशाच्या या कार्यात सक्रिय योगदान द्यावे यासाठी ज्ञानमंडळांची स्थापना केली. त्यानुसार भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था २०१६ च्या जून महिन्यात या कामाशी जोडली गेली आणि  ‘अभिजात भाषा आणि साहित्य’ या ज्ञानमंडळाचे काम संस्थेत सुरू झाले.

संस्कृत, प्राकृत, पाली या भाषांमधील ग्रंथ, ग्रंथकार, संस्था, भाषा आणि अभ्यासकांविषयीची माहिती नव्याने लिहिणे तसेच पूर्वीची माहिती अदययावत करणे असे या कामाचे स्वरूप आहे. या विषयातील जाणकार असे सुमारे तीस लेखक या कामाशी जोडलेले आहेत. हे ज्ञानमंडळ अभिजात भाषांशी संबंधित असल्यामुळे भारतीय तसेच जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त अभिजात भाषा आणि त्यातील साहित्य या विषयांचाही समावेश यात होतो. डॉ. श्रीकांत बहुलकर, डॉ. सदानंद मोरे, डॉ. ग. उ. थिटे असे तज्ज्ञ सल्लागार म्हणून काम करतात. संस्थेचे निबंधक डॉ. श्रीनंद बापट ह्या ज्ञानमंडळाचे विषयपालक आहेत.